# -: निवेदन :-

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता स्थापत्य, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक व सर्व्हेअर या संवर्गातील पदे भरणेबाबत प्रसिध्द करणेत आलेल्या जाहिरात क्रमांक **473/2015** चे अनुषंगाने ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना या निवेदनाद्वारे कळविणेत येते की, उपरोक्त तीनही पदांकरिता रविवार दिनांक 29/3/2015 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 या वेळेत लेखी परीक्षा घेण्यात येणार असून त्याबाबतची प्रवेशपत्रे दिनांक 21/3/2015 पासून महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत (अपलोड करणेत येतील). तरी संबंधित उमेदवारांनी लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावीत व त्यानुसार परीक्षेस उपस्थित रहावे. अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना कागदपत्रांच्या छाननीशिवाय लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवारांस लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी दिली किंवा लेखी परीक्षा उत्तीर्ण झाला तरी पदाची विहीत अर्हता धारण केली असल्याशिवाय व इतर आवश्यक बाबींची पूर्तता झाल्याशिवाय उमेदवार निवडीस पात्र राहणार नाही तसेच त्यास निवडीबाबत कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.

संकेतस्थळावरुन लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध करुन घेणे व लेखी परीक्षेस वेळेवर उपस्थित राहणे ही संबंधित उमेदवारांची जबाबदारी आहे. संकेतस्थळावरील प्रवेशपत्र पाहिले नाही, डाऊनलोड करणेस अडचण आली इत्यादि कोणतीही कारणे विचारात घेतली जाणार नाहीत. उमेदवारांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्यास अडचण आल्यास त्यांनी परीक्षेच्या आधी 2 दिवस सहाय्यक आयुक्त (प्रशासन विभाग), पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे अर्ज सादर करावा त्यांना प्रशासन विभाग येथून लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

दिनांक 29/3/2015 रोजी लेखी परीक्षा संपल्यावर उत्तरसूची (Answer Key) महापालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर उत्तरसूचीबाबत उमेदवारांस काही आक्षेप असल्यास ते दिनांक 1/4/2015 पर्यंत recruitment@pcmcindia.gov.in या ईमेलवर पाठवावेत. त्यानंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

आयुक्त 18/3

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी 18

क्र.प्रशासन/3/कावि/270/2015

दिनांक 18/3/2015

E:\Class3New\2015\जाहिरात २०१५.doc66